जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१६/अंकीर्ण 7949
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक:-13/१२/२०१६

प्रति,

संस्थाचालक,
सर्व शासनमान्य टंकलेखन/लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र राज्य व गोवा.

विषय :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जानेवारी-२०१७
परीक्षा शुल्क व रिपीटर विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्राबाबत..
संदर्भ :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जानेवारी-२०१७ ची अधिसूचना.

उपरोक्त विषयी सुचित करण्यात येते की, जीसीसी परीक्षा जानेवारी-२०१७ साठी विद्यार्थ्यांची नोंदणी केली व परीक्षा फॉर्म भरला आहे. परंतू परीक्षेचे शुल्क भरले नाही. अशा विद्यार्थ्यांसाठी दि.१३/१२/२०१६ पासून प्रति विद्यार्थी ,प्रति विषय, प्रति दिन रु.५०/- (अक्षरी पन्नास रुपये) अति विलंब शुल्क रोखीने भरणेकरीता परीक्षा परिषद, या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून अतिविलंब शुल्क भरण्याची सुविधा दि.१६/१२/२०१६ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

जीसीसी परीक्षा जुन-२०१६ मध्ये जे विद्यार्थी ज्या विषयात अनुत्तीर्ण आहेत, असे विद्यार्थी जीसीसी परीक्षा जाने-२०१७ च्या परीक्षेला रिपीटर म्हणून बसू शकतील. अशा विद्यार्थ्यांनी जीसीसी जून-२०१६ ची मार्कशिट सोबत आणून परीक्षा परिषद,पुणे येथे जीसीसी जाने-२०१७ साठीचे परीक्षेचे फॉर्म व परीक्षा शुल्क दि.१३/१२/२०१६ पासून ते दि.१६/१२/२०१६ पर्यंत भरता येतील. अशा विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क,विलंब शुल्क आणि अतिविलंब शुल्क प्रति विद्यार्थी ,प्रति विषय, प्रति दिन रु.५०/- (अक्षरी पन्नास रुपये) आकारले जाईल. ते रोखीने भरावे लागेल.

संस्थाचालकांनी संबंधित विद्यार्थ्यांचे अभिलेख (जनरल रजिस्टर,हजेरीपत्रक व विद्यार्थ्यांचे फोटो इ.) घेऊन समक्ष परीक्षा परिषद या कार्यालयात उपस्थित रहावे.

(सुखदेव डेरे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -१

C:\Documents and Settings\NET\Desktop\JAN - 2017\LETTER.docx